॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 8 — ASHTAMADHYAAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

Continuing his sacred pilgrimage, Machchindranath journeys through Vajravatika, Dwarka, and the holy waters of the Gomati river before arriving at the ancient city of Ayodhya. After purifying himself in the Sarayu river, the young master seeks a divine audience at the temple of Shri Rama. However, King Pashupat of the Surya dynasty arrives with his vast army, and the royal gatekeepers roughly shove the ascetic away from the temple doors. Machchindranath responds not with anger, but with supreme yogic power; casting a pinch of sacred ash charged with the Sparshastra, he instantly pins the king to the earth, rendering him completely immovable. Recognizing the ascetic's divinity, the king's wise minister begs for mercy, prompting Machchindranath to release the humbled monarch, who gratefully seats the yogi upon a golden throne. When the devoted king asks to behold his divine ancestor Shri Rama, Machchindra ascends to confront the Sun God himself to win the boon. A terrifying cosmic duel ensues as Machchindranath Counters the Sun's divine weapons, ultimately shattering Aditya's celestial chariot and plunging the world into absolute darkness. Terrified by the cosmic imbalance, the supreme trinity of Brahma, Vishnu, and Shiva descend alongside the gods, leading to a grand appearance by Shri Rama who embraces the master and grants King Pashupat his ultimate desire. Lord Vishnu blesses the Surya mantra of the Sabari Vidya, the Sun God is revived to validate the eternal power of the mantra, and Machchindranath peacefully departs Ayodhya to continue his divine mission.

Ovee 1

ॐ नमोजी गुरुराया । भवच्छेदका पळवीं माया । श्रीज्ञानेश्वरा सदयहृदया । मम किंचित नाम मिरविशी ॥

Transliteration

Om namojee Guru-raayaa | Bhava-cchedakaa palavee maayaa | Shree-Jnyaaneshvaraa sadaya-hridayaa | Mama kinchita naama miravishee ||

Ovee 2

अघा हे ज्ञानदिवटी । आम्हा साधकां जे दिठी । मिरवला आहेसी पूर्णकोटी । हितकारक महाराजा ॥

Transliteration

Aghaa hey jnyaana-divatee | Aamhaa saadhakaa je dithee | Miravalaa aahesee poorna-kotee | Hina (Hita)-kaaraka Mahaaraajaa ||

Ovee 3

तरी मागिले अध्यायीं कथन । विधियुक्त वीरभद्र केला प्रसन्न । आणि स्वर्गवासातें भोगून । महीलागीं मच्छिंद्र उतरला ॥

Transliteration

Taree maagile adhyaayee kathanu | Vidhi-yukta Veera Bhadra kelaa prasannu | Aani Svarga-vaasaate bhoguunu | Mahee-laagee Machchindra utaralaa ||

Ovee 4

आणि वज्रावटिके वज्र भगवती । तोषविलें स्नानाप्रती । उष्णोदकीं भोगावती । जगामाजी मिरविली ॥

Transliteration

Aani Vajraa-vatike Vajra Bhagavatee | Tophavile (Toshavile) snaanaa-pratee | Ushno-dakee bhogaa-vatee | Jagaa-maajee miravilee ||

Ovee 5

यापरी द्वारका करुनि तीर्थ । गोमतीं स्नानविधी यथार्थ । करुनियां द्वारकानाथ । प्रसन्न चित्तीं आगळा ॥

Transliteration

Yaaparee Dvaarakaa karuni teerthu | Gomatee snaana-vidhee yathaarthu | Karuniyaa Dvaarakaa-Naathu | Prasanna chittee aagalaa ||

Ovee 6

त्यावरी आला अयोध्येसी । तरी श्रोतिया कथा परियेसीं । स्नान करुनि शरयूतीरासी । रामदर्शना जातसे ॥

Transliteration

Tyaavaree aalaa Ayodhyesee | Taree shrotiyaa kathaa pariyesee | Snaana karuni Sharayoo-teeraasee | Raama-darshanaa jaatase ||

Ovee 7

तों पशुपतराव तया ग्रामीं । रामवंशांत पराक्रमी । तो देवालयीं पूजेलागुनी । आला होता संभारें ॥

Transliteration

Toh Pashupata-raava tayaa graamee | Raama-vamshaanta paraakramee | Toh devaalayee pooje-laagunee | Aalaa hotaa sambhaare ||

Ovee 8

अपार सैन्य जें भोंवतीं । सदनीं तुरंगमें राबती । छत्रचामरें कळसदीप्ती । लाजविती भानूतें ॥

Transliteration

Apaara sainya je bhovatee | Sadanee turangame raavatee (raabatee) | Chatra-chaamare kalasadeeptee | Laajavitee mhanute (bhaanoote) ||

Ovee 9

वाजी गज यांचे रंग आणिक । तेही चपळ अलोलिक । वाताकृती लक्ष एक । तयाभोवतें फिरताती ॥

Transliteration

Vaajee gaja yaanche ranga aaniku | Tehee chapala aloliku | Vaataa-kritee laksha eku | Tayaa-bhovate phirataatee ||

Ovee 10

सकळ वाजी श्रृंगारयुक्त । जडित पाखरा हाटकवत । रत्नकोंदणीं हार लखलखीत । कीं नक्षत्रमणी मिरवले ॥

Transliteration

Sakala vaajee shrringaara-yuktu | Jadita paakharaa haataka-vatu | Ratna-kondanee haara lakhalakheetu | Kee nakshatra-manee miravale ||

Ovee 11

त्यांतही झळकत झालरीयुक्त । गुणीं ओविले अपार मुक्त । कोणी विराजत गंगावत । शुभ्रतेजीं मितवले ॥

Transliteration

Tyaata-hee jhalakata jhaalaree-yuktu | Gunee ovile apaara muktu | Konee viraajata Gangaa-vatu | Shubhra-tejee miravale ||

Ovee 12

ग्रीवे माळा रत्नवती । हाटकासी जे ढाळ देती । रत्न नोहे तेजगभस्ती । चमूलागी मिरवला ॥

Transliteration

Greeve maalaa ratna-vatee | Haatakaasee je dhaala detee | Ratna nohe teja-gabhastee | Chamoo-laagee miravalaa ||

Ovee 13

पदीं पैंजण रुणझुणती । कीं वीरांची वीरश्री वाचे वदती । कीं शत्रुगणींच्या अपार पंक्ती । ब्रीद म्हणती विभांडूं ॥

Transliteration

Padee painjana runa-jhunatee | Kee veeraanchee veera-shree vaache vadatee | Kee shatru-ganeencyaa apaara panktee | Breeda mhanatee vibhaandoo ||

Ovee 14

ऐशियापरी वाजी ते हौसे । कीं चिंतल्या ठायीं दाविती वास । अतिवातचपळगतीस । सर सर म्हणती माघारा ॥

Transliteration

Aishiyaa-paree vaajee tey hause | Kee chintalyaa thaayee daavitee vaasu | Ati-vaata-chapala-gateesu | Sara sara mhanatee maaghaaraa ||

Ovee 15

अगा ते वाजी न म्हणूं महीचे । कीं इंदुबंधुरत्न उदधीचे । विशाळ शुक्तीकापात्र अब्धीचें । मुक्त करुनि आणिले ते ॥

Transliteration

Agaa tey vaajee na mhanoo maheeche | Kee indubandhu-ratna udadheeche | Vishaala shukteekaa-paatra abdheeche | Mukta karuni aanile tey ||

Ovee 16

याचकनीती विकासूनि अवनीं । हत्ती मिरवती पृतनेलागुनी । विशाळ गंडस्थळ दंतकदनी । चूडे सुवर्ण मिरवलें ॥

Transliteration

Yaachaka-neetee vikaasuuni avanee | Hattee miravatee prutane-laagunee | Vishaala gandasthala danta-kadanee | Choode suvarna miravale ||

Ovee 17

हाटक व्यक्त त्यां भूषण । हौदे अंबारिया देदीप्यमान । कीं पृतनामहीचे नग ते पूर्ण । भावनीं ऐसें पाहे कां ॥

Transliteration

Haataka vyakta tyaa bhooshanu | Haude ambaariyaa daideepya-maanu | Kee prutanaa-maheeche naga tey poornu | Bhaavanee aise paahe kaa ||

Ovee 18

अपार सैन्य बहु संभार । पाहतां उचलिले जे गिरिवर । कीं पर्वत माथां तरुशृंगार । तैशा पताका गजपृष्ठीं ॥

Transliteration

Apaara sainya bahu sambhaaru | Paahataa uchalile je girivaru | Kee parvata maathaa taru-shringaaru | Taishaa pataakaa gaja-prishthee ||

Ovee 19

एकाहूनि एक अधिक । महारथी ते युद्धकामुक । दहा सहस्त्र रायासवें लोक । युद्धकामुक असती ॥

Transliteration

Ekaahuuni eka adhiku | Mahaa-rathee tey yuddha-kaamuku | Dahaa sahastra raayaa-save loku | Yuddha-kaamuka asatee ||

Ovee 20

परी युद्धशास्त्री चतुर सुगम । कीं परमशक्तीस देती दम । ऐसे प्रतापीक स्तोम । इंद्रसुखा आगळे कीं ॥

Transliteration

Paree yuddha-shaastree chatura sugamu | Kee parama-shakteesa detee damu | Aise prataapeeka stomu | Indra-sukhaa aagale kee ||

Ovee 21

पायींचे पायदळ अपार । वस्त्राभरणीं मंडिताकार । छडीदार आणि चोपदार । जासूद हलकारे मिरवती ॥

Transliteration

Paayeenche paaya-dala apaaru | Vastra-aabharanee mandita-aakaaru | Chadee-daara aani chopa-daaru | Jaasooda halakaare miravatee ||

Ovee 22

हेमभूषणीं मुक्तमाळा । सकळ पाइकां झळकती गळां । जडितरत्नीं अति तेजाळा । हेमालंकार करकमळीं ॥

Transliteration

Hema-bhooshanee mukta-maalaa | Sakala paaikaa jhalakatee galaa | Jadita-ratnee ati tejaalaa | Hema-alankaara kara-kamalee ||

Ovee 23

दाहीं अंगुळीं मुद्रिका गहन । हेमयुक्तें ते मिरवती श्रवण । पहातेपणीं राणीवपण । भार पडेल लोकातें ॥

Transliteration

Daahee angulee mudrikaa gahanu | Hema-mukte tey miravatee shravanu | Pahaate-panee raaneeva-panu | Bhaara padela lokaate ||

Ovee 24

असो ऐशी अपार संपत्ती । मिरवला पाशुपत अयोध्यापती । ते सकळ दाटी देवळाभोंवतीं । राजीराजीने मिरवली ॥

Transliteration

Aso aishee apaara sampattee | Miravalaa Paashupata Ayodhyaa-patee | Tey sakala daatee devalaa-bhovatee | Raajee-raajeene miravalee ||

Ovee 25

त्यांत श्रीरामदर्शनाकारण । जाता झाला योगद्रुम । परी ते द्वारपाळ परम । नाथालागीं बोलत ॥

Transliteration

Tyaata Shree-Raama-darshanaa-kaaranu | Jaataa jhaalaa yoga-drumu | Paree tey dvaara-paala paramu | Naathaa-laagee bolatu ||

Ovee 26

परम पाप संचल्या तुंबळ । तेव्हां मिरवे द्वारपाळ । प्रथम धर्मालागीं काळ । अधर्मपरी मिरवतसे ॥

Transliteration

Parama paapa sanchalyaa tumbalu | Tevhaa mirave dvaara-paalu | Prathama dharmaa-laagee kaalu | Adharma-paree miravatase ||

Ovee 27

त्या धर्मद्वारींचे म्हणती श्वान । ते द्वारपाळ द्वाररक्षण । आपण बुडुनि यजमाना । बुडवूं पाहती निश्चयें ॥

Transliteration

Tyaa dharma-dvaareenche mhanatee shvaanu | Tey dvaara-paala dvaara-rakshanu | Aapana buduni yajamaanaa | Budavoo paahatee nishchaye ||

Ovee 28

महानष्ट जातां समोर । कदा न म्हणती लहानथोर । न भीड चित्तीं परम निष्ठुर । वाचे कठोर बोलती ॥

Transliteration

Mahaa-nashta jaataa samoru | Kadaa na mhanatee lahaana-thoru | Na bhanda chittee parama nishthuru | Vaache kathora bolatee ||

Ovee 29

सप्तजन्म तस्करनीती । शत ब्रह्महत्या जया घडती । तेव्हां तो पावे द्वारपाळ क्षितीं । धर्मविनाश रायाचा ॥

Transliteration

Sapta-janma taskara-neetee | Shata brahma-hatyaa jayaa ghadatee | Tevhaa toh paave dvaara-paala kshitee | Dharma-vinaasha raayaachaa ||

Ovee 30

ऐसियेपरी द्वारपाळ । राजद्वारीं असती सकळ । मच्छिंद्र जातां उतावेळ । हटकूनि डंभ केली असे ॥

Transliteration

Aisiye-paree dvaara-paalu | Raaja-dvaaree asatee sakalu | Machchindra jaataa utaavelu | Hatakuuni dambha kelee ase ||

Ovee 31

तीव्र वाचे बोलती वचन । म्हणती कान फाडूनि बुद्धिहीन । कोठें जासी तांतडीनें । मतिमंदा हे मूर्खा ॥

Transliteration

Teevra vaache bolatee vachanu | Mhanatee kaana phaaduuni buddhi-heenu | Kothe jaasee taatadeene | Matimandaa hey moorkhaa ||

Ovee 32

हे भ्रष्टा तूतें कैसें कळेना । कीं राव आला आहे दर्शना । त्यात तूं जासी बुद्धिहीना । सर परता माघारा ॥

Transliteration

Hey bhrashtaa toote kaise kalenaa | Kee raava aalaa aahe darshanaa | Tyaata too jaasee buddhi-heenaa | Sara parataa maaghaaraa ||

Ovee 33

ऐसें म्हणूनि निष्ठुर वचन हातीं । लोटिलें मच्छिंद्रनाथाप्रती । येणेकरुनि परम चित्तीं । विक्षेपातें पावला ॥

Transliteration

Aise mhanuuni nishthura vachana haatee | Lotile Machchindra-Naathaa-pratee | Yene-karuni parama chittee | Vikshepaate paavalaa ||

Ovee 34

परी तो सर्वज्ञ संतापासी । विवेक अर्गळा घाली त्यासी । तो म्हणे सेवकांसीं । संवाद करणें विहित नव्हे ॥

Transliteration

Paree toh sarvajnya santaapaa-see | Viveka argalaa ghaalee tyaasee | Toh mhane sevakaansee | Savaada karane vihita navhe ||

Ovee 35

पतिस्वाधीन पतिव्रता । कीं पात्रसोई वाहे सरिता । तेवीं बुद्धि करुनि पाशुपता । सेवक सेवा आव्हानिती ॥

Transliteration

Pati-svaadheena pati-vrataa | Kee paatrasoee vaahe saritaa | Tevee buddhi karuni Paashupataa | Sevaka sevaa aavhaanitee ||

Ovee 36

कीं सुईमागें गुंतोजातां । कीं मित्रामागें रश्मी येतां । तदनबुद्धि पाशुपता । सेवक सेवा आव्हानिती ॥

Transliteration

Kee suee-maage guntojaataa | Kee Mitraa-maage rashmee yetaa | Tadanu-buddhi Paashupataa | Sevaka sevaa aavhaanitee ||

Ovee 37

कीं रत्नामागे सकळकळा । माउलीसवे आव्हानूं बाळा । तदनबुद्धि अयोध्यानृपाळा । सेवक सेवा आव्हानिती ॥

Transliteration

Kee ratnaa-maage sakala-kalaa | Maaulee-save aavhaanoo baalaa | Tadanu-buddhi Ayodhyaa-nripaalaa | Sevaka sevaa aavhaanitee ||

Ovee 38

कीं माळी मळ्याचा योजूनि पंथ । सयुक्त सोडी उदक आत । तदनबुद्धि पाशुपत । सेवक सेवा आव्हानिती ॥

Transliteration

Kee maalee malyaachaa yojuuni panthu | Sayukta sodee udaka aatu | Tadanu-buddhi Paashupatu | Sevaka sevaa aavhaanitee ||

Ovee 39

ऐसिये शब्दां सद्गुणवाणी । बोधी सकळां विवेकखाणी । बंधनीं निर्मूनि विक्षेप मनाचे चरणीं । घालितां झाला महाराज ॥

Transliteration

Aisiye shabdaa sad-guna-vaanee | Bodhee sakalaa viveka-khaanee | Bandhanee nirmuuni vikshepa manaache charanee | Ghaalitaa jhaalaa Mahaaraaja ||

Ovee 40

परी बुद्धिप्रकरण । आणिक सुचलें तयाकारण । कीं सेवकांतें काय बोलून । शिक्षा देऊं राजातें ॥

Transliteration

Paree buddhi-prakaranu | Aanika suchale tayaa-kaaranu | Kee sevakaante kaaya boluunu | Shikshaa deoo raajaate ||

Ovee 41

एक रांव आर्हाटिता । संपूर्ण सेवकां दाटे व्यथा । जेवीं गवसणी मित्रा घालितां । रश्मी आतुडती सहजचि ॥

Transliteration

Eka raava aarhaatitaa | Sampoorna sevakaa daate vyathaa | Jevee gavasanee Mitraa ghaalitaa | Rashmee aatudatee sahajachi ||

Ovee 42

शरीरीं कोठें घालितां घाय । परी सर्वोपरी दुःख होय । तदनुशिक्षा योजितां राया । दुःख मिरवी पृतनेतें ॥

Transliteration

Shareeree kothe ghaalitaa ghaayu | Paree sarvoparee dukha hoyu | Tadanu-shikshaa yojitaa raayaa | Dukha miravee prutanete ||

Ovee 43

ऐसें योजूनि मच्छिंद्रनाथ । भस्मचिमुटी कवळी हाता । स्पर्शास्त्रमंत्रप्रयुक्ता । रामनामीं जल्पला ॥

Transliteration

Aise yojuuni Machchindra-Naathu | Bhasma-chimutee kavalee haataa | Sparsha-astra-mantra-prayuktaa | Raama-naamee jalpalaa ||

Ovee 44

येरीकडे पाशुपत । देवा बद्धांजुळी होऊनि प्रणत । रामासन्मुख दंडवत । महीं मस्तक ठेवीतसे ॥

Transliteration

Yereekade Paashupatu | Devaa baddha-anjulee houuni pranatu | Raamaa-sammukha dandavatu | Mahee mastaka theveetase ||

Ovee 45

तों स्पर्श मग येऊनि निकट । करिता झाला अंग झगट । झगट होतां महीपाठ । भाळा सहज झालीसे ॥

Transliteration

Toh sparsha maga yeuuni nikatu | Karitaa jhaalaa angi jhagatu | Jhagata hotaa mahee-paathu | Bhaala sahaja jhaaleese ||

Ovee 46

राव उठूं पाहे क्षणीं । परी सुदृढ युक्त न सोडी मेदिनी । भाळपदादी उभयपणीं । महीयुक्त झालीं तीं ॥

Transliteration

Raava uthoo paahe kshanee | Paree sudrudha yukta na sodee medinee | Bhaala-padaadee ubhaya-panee | Mahee-yukta jhaalee tee ||

Ovee 47

करितां यत्न बहुतांपरी । परी विभक्त नोहे कदा धरित्री । बहु श्रमला नानापरी । उपाय कांही चालेना ॥

Transliteration

Karitaa yatna bahutaan-paree | Paree vibhakta nohe kadaa dharitree | Bahu shramalaa naanaa-paree | Upaaya kaahee chaalenaa ||

Ovee 48

मग बोलावूनि सेवकमंत्री । वृत्तांत सांगे झाल्यापरी । म्हणे कदा न सोडी धरित्री । व्यक्त झाली सर्वस्वें ॥

Transliteration

Maga bolaavuuni sevaka-mantree | Vrittaanta saange jhaalyaa-paree | Mhane kadaa na sodee dharitree | Vyakta jhaalee sarvasve ||

Ovee 49

परी मंत्री बुद्धिमंत । एकटाचि तेव्हां बाहेर येत । सेवकां पुसे रळी मात । कोणी कोणातें झाली कां ॥

Transliteration

Paree mantree buddhi-mantu | Ekataachi tevhaa baahera yetu | Sevakaa puse ralee maatu | Konee konaate jhaalee kaa ||

Ovee 50

मनांत म्हणे कोणी जाती । आला असेल नगराप्रती । गांजिला असेल राजदूतीं । म्हणून क्षोभला असेल तो ॥

Transliteration

Manaanta mhane konee jaatee | Aalaa asela nagaraa-pratee | Gaanjilaa asela raajadootee | Mhanuuna kshobhalaa asela toh ||

Ovee 51

मग त्यातें क्षोभ न येतां । क्षोभ वरिला श्रीभगवंता । तयाचे साधु जगीं छळितां । क्रोध नावरे देवासी ॥

Transliteration

Maga tyaate kshobha na yetaa | Kshobha varilaa Shree-Bhagavantaa | Tayaache saadhu jagee chalitaa | Krodha naavare devaasee ||

Ovee 52

महीं श्रेष्ठ तो अत्रिनंदन । परी उगेंचि क्षोभवूनि आपुलें मन । श्रीअंबऋषींचे केले छळण । तरी न साहे देवातें ॥

Transliteration

Mahee shreshtha toh Atrinandanu | Paree ugenchi kshobhavuuni aapule manu | Shree-Ambarisheenche kele chalanu | Taree na saahe daivaate ||

Ovee 53

तेणें सुदर्शन लावूनि पाठीं । गर्भ सोसी आपण जगजेठी । तस्मात् भक्त गांजिल्यापाठीं । कदा न राहवे देवातें ॥

Transliteration

Tene Sudarshana laavuuni paathee | Garbha sosee aapana jaga-jethee | Tasmaatu bhakta gaanjilyaa-paathee | Kadaa na raahave devaate ||

Ovee 54

भजनीं प्रेमा प्रल्हादबाळा । परम आवडे तमाळनीळा । दानवीं गांजितां उतावळा । कोरडे काष्ठीं प्रगटला ॥

Transliteration

Bhajanee premaa Pralhaada-baalaa | Parama aavade tamaala-neelaa | Daanavee gaanjitaa utaavalaa | Korade kaashthee pragatalaa ||

Ovee 55

धर्महवनीं मंडूकबाळ । तप्तोदकीं केले शीतळ । तस्मात् संकटी भक्त प्रेमळ । कदा न राहवे देवातें ॥

Transliteration

Dharma-havanee mandooka-baalu | Taptodakee kele sheetalu | Tasmaatu sankatee bhakta premalu | Kadaa na raahave devaate ||

Ovee 56

रणीं होतां कडकडाट बहुत । पक्षिजोडा बाळें टाकूनि जात । बाळकांनीं स्मरतां रमानाथ । करिवंटा टाकी तयांवरी ॥

Transliteration

Ranee hotaa kada-kadaata bahutu | Pakshi-jodaa baale taakuuni jaatu | Baalakaannee smarataa Ramaa-Naathu | Kari-ghantaa taakee tayaa-varee ||

Ovee 57

पारधी पक्षिप्राणहरणीं । व्याळरुप झाले चक्रपाणी । तस्मात् दासाचा छळ कोणीं । कदाकाळीं करुं नये ॥

Transliteration

Paaradhee pakshi-praana-haranee | Vyaala-rupa jhaale Chakra Paanee | Tasmaatu daasaachaa chala konee | Kadaa-kaalee karu naye ||

Ovee 58

जळीं पदातें नक्र ओढी । स्मरतां धांवला अतितांतडी । सुदर्शन प्रेरुनि घाली उडी । निजदासा रक्षावया ॥

Transliteration

Jalee padaate nakra odhee | Smarataa dhaavalaa ati-taatadee | Sudarshana preruni ghaalee udee | Nija-daasaa rakshaavayaa ||

Ovee 59

याचि नीतीं कोणें दूतीं । गांजिली असेल हरिभक्ती । म्हणूनि लोभे सायक हातीं । हरीनें वरिला असेल कीं ॥

Transliteration

Yaachi neetee kone dootee | Gaanjilee asela Hari-bhaktee | Mhanuuni lobhe saayaka haatee | Hareene varilaa asela kee ||

Ovee 60

ऐशी भावना आणूनि चित्तीं । शोध करीतसे पृतनेप्रती । शोध सोचिता द्वारा निगुती । वृत्तांत तो प्रविष्ट झाला ॥

Transliteration

Aishee bhaavanaa aanuuni chittee | Shodha kareetase prutane-pratee | Shodha sochitaa dvaaree nigutee | Vrittaanta toh pravishta jhaalaa ||

Ovee 61

मंत्री वृत्तांत ऐकूनि कानीं । शोधूनि काढी मच्छिंद्रमुनी । धन्य मंत्री तो शोधप्रकरणीं । अर्थपैशुन्य निवडिता ॥

Transliteration

Mantree vrittaanta aikuuni kaanee | Shodhuuni kaadhee Machchindra-munee | Dhanya mantree toh shodha-prakaranee | Artha-paishunya nivaditaa ||

Ovee 62

अहो तो मंत्री नोहे मोहरा । अमृत घेऊनि सांडी मदिरा । कीं चिंता मणिराज अधीरा । राजचिंताहरणार्थ ॥

Transliteration

Aho toh mantree nohe moharaa | Amrita gheuuni saandee madiraa | Kee chintaa mani-raaja adheeraa | Raaja-chintaa-haranaartha ||

Ovee 63

तन्यायें तो सुघडकरणी । त्वरें लागला मच्छिंद्रचरणीं । मग म्हणे महाराजा औदार्यपणीं । कृपादान ओपावें ॥

Transliteration

Tannyaaye toh sughada-karanee | Tvare laagalaa Machchindra-charanee | Maga mhane Mahaaraajaa audaarya-panee | Kripaa-daana opaave ||

Ovee 64

तुम्ही संत ते स्नेहभरित । पूर्णशांतीचे भांडारयुक्त । औदार्य सांगतां नाहीं मित । अपराध क्षमा करावा ॥

Transliteration

Tumhee santa tey sneha-bharitu | Poorna-shaanteeche bhaandaara-yuktu | Audaarya saangataa naahee mitu | Aparaadha kshamaa karaavaa ||

Ovee 65

मेघ जरी उदार म्हणावा । तोही समता न करी संतमाथा । मेव विसरे दातृत्वभावा । तेवी संत नोहे तो ॥

Transliteration

Megha jaree udaara mhanaavaa | Tohee samataa na karee santa-matha| Megha visare daatrtvabhava | Tevee santa nohe toh ||

Ovee 66

जरी परिसाची उपमा देऊं । तो लोहातेचि देत हाटकभाऊ । इतर धातूसी होत परिभवू । न चले शक्ती तयाची ॥

Transliteration

Jaree parisaachee upamaa deoo | Toh lohaatechi deta haataka-bhaaoo | Itara dhaatoosee hota pari-bhavoo | Na chale shaktee tayaachee ||

Ovee 67

कल्पतरु जरी करावा समान । शुभाशुभ दावी रत्न । तेवीं नोहे संतजन । शुभचिन्हेंचि वांछिती ॥

Transliteration

Kalpataru jaree karaavaa samaanu | Shubha-ashubha daavee ratnu | Tevee nohe santajanu | Shubha-chinhenchi vaanchitee ||

Ovee 68

ऐसें बोलतां मच्छिंद्रनाथ । प्रसन्न झाले स्वचित्तांत । क्रोध आवरुनि होतां शांत । प्रसाद देऊं म्हणतसे ॥

Transliteration

Aise bolataa Machchindra-Naathu | Prasanna jhaale sva-chittaatu | Krodha aavaruni hotaa shaantu | Prasaada deoo mhanatase ||

Ovee 69

मग करीं कवळूनि भस्म चिमुटी । विभक्त अस्त्र मंत्रपोटीं । कविराज जल्पतां होटीं । धरा चिमुटी सोडीतसे ॥

Transliteration

Maga karee kavaluuni bhasma chimutee | Vibhakta astra mantra-potee | Kaviraaja jalpataa hotee | Dharaa chimutee sodeetase ||

Ovee 70

राव उठूनि बैसे धरित्री । वेगीं पाचारीतसे सुहितमंत्री । सर्वेंचि येऊनि झडकरी । दूती राजाज्ञा निवेदिली ॥

Transliteration

Raava uthuuni baise dharitree | Vegee paachaareetase suhita-mantree | Sarvenchi yeuuni jhada-karee | Dootee raaja-ajnyaa nivedilee ||

Ovee 71

पत्रिके बोलावूनि निकट दूत । विचारुनि घेतो राजक्षेमांत । तंव ते शुभवार्ता सांगत । कल्याणें राजा विराजला ॥

Transliteration

Patrike bolaavuuni nikata dootu | Vichaaruni gheto raaja-kshemaantu | Tava tey shubha-vaartaa saangatu | Kalyaane raajaa viraajalaa ||

Ovee 72

मग मच्छिंद्राचा धरुनि पाणी । मंत्री नेत तया लागुनी । प्रवेश होता तये क्षणीं । वृत्तांत रायातें निवेदिला ॥

Transliteration

Maga Machchindraachaa dharuni paanee | Mantree neta tayaa laagunee | Pravesha hotaa tayekshanee | Vrittaanta raayaate nivedilaa ||

Ovee 73

रायें ऐकूनि सकळ वृत्तांत । मच्छिंद्र चरणीं भाळ अर्पीत । अति गौरवें स्नेहभरित । नाम पुसे तयाप्रती ॥

Transliteration

Raaye aikuuni sakala vrittaantu | Machchindra charanee bhaala arpeetu | Ati gaurave sneha-bharitu | Naama puse tayaa-pratee ||

Ovee 74

येरी म्हणे नरेंद्रपाळा । मज मच्छिंद्र म्हणती तान्हुल्या बाळा । रायें ऐकूनि वृत्तांत सकळा । मच्छिंद्र चरणीं प्रेरीतसे ॥

Transliteration

Yeree mhane narendra-paalaa | Maja Machchindra mhanatee taanhulyaa baalaa | Raaye aikuuni vrittaanta sakalaa | Machchindra charanee prereetase ||

Ovee 75

पूर्वी मच्छिंद्रकृतिरत्न । सांठवलें श्रवणाकारणें । तेणेकरुनि दर्शनभूषण । स्वीकारावयासी पहातसे ॥

Transliteration

Poorvee Machchindra-kriti-ratnu | Saathavale shravanaa-kaarane | Tenekaruni darshana-bhooshanu | Sveekaaraavayaasee pahaatase ||

Ovee 76

ऐसी इच्छा अब्धापाठीं । तो मच्छिंद्रचंद्र देखीला दृष्टी । मग परम मनीं आनंददाटी । चित्रपात्री हेलावली ॥

Transliteration

Aisee ichchaa abdhaan-paathee | Toh Machchindra-Chandra dekheelaa drishtee | Maga parama manee aananda-daatee | Chitra-paatree helaavalee ||

Ovee 77

मग सुखासनें सिद्ध करुन । राजाने मच्छिंद्राचा हात धरुन । आपुले सभास्थानीं नेऊन । कनकासनी बैसविला ॥

Transliteration

Maga sukhaasane siddha karunu | Raajaane Machchindraachaa haata dharunu | Aapule sabhaa-sthaanee neuunu | Kanaka-aasanee baisavilaa ||

Ovee 78

षोडशोपचारें पूजन । अर्पिता झाला तन मन धन । वरी परम आदरें भक्तिरत्न । मच्छिंद्रनाथ ओपीतसे ॥

Transliteration

Shodasha-upachaare poojanu | Arpitaa jhaalaa tana mana dhanu | Varee parama aadare bhakti-ratnu | Machchindra-Naatha opeetase ||

Ovee 79

सदा सर्वदा आसनीं शयनीं । गमनीं भोजनीं जोडूनि पाणी । निरंतर उभा सेवेलागुनी । अन्य कांहीं सुचेना ॥

Transliteration

Sadaa sarvadaa aasanee shayanee | Gamanee bhojanee joduuni paanee | Nirantara ubhaa seve-laagunee | Anya kaanhee suchenaa ||

Ovee 80

ऐशिया भक्तीचा पाहतां पाठ । मच्छिंद्रकृपेचा लोटला लोट ।
म्हणे कोण नरेंद्र कामनालोट । कवण चित्तीं दाटतसे ॥

Transliteration

Aisiyaa bhakteechaa paahataa paathu |Machchindra-kripechaa lotalaa lotu |
Mhane kona narendra kaamanaa-lotu |Kavana chittee daatatase ||

Ovee 81

येरु म्हणे जी योगद्रुमा । मी सूर्यवंशी पाशुपतनामा । राम अवलाद कुशपत्नीधामा । अवलाद देह असे हा ॥

Transliteration

Yeru mhane jee yogadrumaa | Mee Soorya Vamshee Paashupata-naamaa | Raama avalaada Krusha-patnee dhaamaa | Avalaada deha ase haa ||

Ovee 82

तरी वडील माझा विजयी ध्वज । श्रीराम अवतरे तेज:पुंज । मातें भेटवी महाराजा । मित्रकुळाचा टिळक जो ॥

Transliteration

Taree vadeela maajhaa vijayee dhvaju | Shree-Raama avatare tejapunju | Maate bhetavee Mahaaraajaa | Mitra-kulaachaa tilaka jo ||

Ovee 83

येरी म्हणे रे भाऊका दिठीं । आतां करितों तयाची भेटी । मग सभेबाहेरी तपोजेठी । राया घेऊनि येतसे ॥

Transliteration

Yeree mhane re bhaavookaa dithee | Aataa karito tayaachee bhetee | Maga sabhe-baaheree tapojethee | Raayaa gheuuni yetase ||

Ovee 84

उभा राहूनि राजांगणीं । धूमास्त्र मंत्र जल्पे वाणी । भस्मचिमुटी संजीवनी । अर्कावरी प्रेरितसे ॥

Transliteration

Ubhaa raahuuni raaja-anganee | Dhooma-astra mantra jalpe vaanee | Bhasma-chimutee sanjeevanee | Arkaavaree preritase ||

Ovee 85

तेणें ध्रुव खगमंडळ संपूर्ण । धूम्रे भरुनि गेले गगन । दिशांसह अर्क संपूर्ण । झांकाळूनि पैं गेला ॥

Transliteration

Tene dhruva khaga-mandala sampoornu | Dhoomre bharuni gele gaganu | Dishaan-saha Arka sampoornu | Jhaankaaluuni pai gelaa ||

Ovee 86

धूम्रास्त्रानें भरले नयन । नेत्र पुसीतसे सारथी अरुण । धूम्र संचारोनि मुखाकारण । कासावीस होतसे ॥

Transliteration

Dhoomra-astraane bharale nayanu | Netra puseetase saarathee Arunu | Dhoomra sanchaaroni mukhaa-kaaranu | Kaasaaveesa hotase ||

Ovee 87

तें पाहुनि सविताराज । म्हणे अस्त्रविद्ये धूम्र विराजे । क्षत्रिय कुळांतील नरेंद्र ओजें । तेणें प्रेरली ही विद्या ॥

Transliteration

Tey paahuni Savitaa-raaju | Mhane astra-vidye dhoomra viraaje | Kshatriya kulaanteela narendra oje | Tene preralee hee vidyaa ||

Ovee 88

मग तो महाराज जगलोचन । कवळूनि सायका चढवूनि गुण । वायुअस्त्र शर निर्मून । सोडिता झाला महाराजा ॥

Transliteration

Maga toh Mahaaraaja jaga-lochanu | Kavaluuni saayakaa chadhavuuni gunu | Vaayu-astra shara nirmuunu | Soditaa jhaalaa Mahaaraajaa ||

Ovee 89

तंव तो शर प्रतापवंत । लवकरी प्रगटवी स्थावर मारुत । तेणें मंदराचळ पर्वत । हालूं पाहती डगडगां ॥

Transliteration

Tava toh shara prataapa-vantu | Lavakaree pragatavee sthaavara maarutu | Tene Mandaraa-chala parvatu | Haaloo paahatee dagadagaa ||

Ovee 90

गगनापासूनि महीपर्यंत । प्रगट झाला प्रलयवात । तरु उचंबळूनि नभीं भ्रमत । पक्षी जेवीं भूगोलातें ॥

Transliteration

Gaganaa-paasuuni mahee-pariyantu | Pragata jhaalaa pralaya-vaatu | Taru uchambaluuni nabhee bhramatu | Pakshee jevee bhoogolaate ||

Ovee 91

ऐसा वात होतां प्रगट । धूम्रें फुटला दिशापाट । सदनालागीं निर्मळ वाटे । गमन करितां येईना ॥

Transliteration

Aisaa vaata hotaa pragatu | Dhoomre phutalaa dishaa-paatu | Sadanaa-laagee nirmala vaate | Gamana karitaa yee-naa ||

Ovee 92

तें पाहुनिया योगद्रुम । जल्पता झाला अस्त्र उत्तम । तें पर्वतास्त्र विशाळ प्रकाम । आड झालें रथातें ॥

Transliteration

Tey paahuniyaa yoga-drumu | Jalpataa jhaalaa astra uttamu | Tey Parvata-astra vishaala prakaamu | Aada jhaale rathaate ||

Ovee 93

विशाळपणीं सांगूं कितुलें । कीं मंदराचळचि दुजे उगवले । तेणे मार्ग कुंठित जाहले । वातचक्राचे महाराजा ॥

Transliteration

Vishaala-panee saangoo kitule | Kee Mandaraa-chalachi duje ugavale | Tene maarga kunthita jaahale | Vaata-chakraache Mahaaraaju ||

Ovee 94

मग ते अस्त्रीं नारायण । पर्वत पाहतां विशाळपणें । मग वज्रास्त्रसंधान । करिता झाला अर्क तो ॥

Transliteration

Maga tey astree Naaraayanu | Parvata paahataa vishaala-pane | Maga Vajra-astra-sandhaanu | Karitaa jhaalaa Arka toh ||

Ovee 95

तंव वज्रास्त्र अतिकठिण । पर्वतमाथें गेले भेदून । तेणें घायें शतचूर्ण । त्वरें झाले नगराज ॥

Transliteration

Tava Vajra-astra ati-kathinu | Parvata-maathe gele bheduunu | Tene ghaaye shata-choornu | Tvare jhaale nagaraaja ||

Ovee 96

पर्वत चूर्ण होतां निगुतीं । तें पाहुनि मच्छिंद्रजती । भ्रमी अस्त्र योजूनि उपरती । मित्र भागीं सांडीतसे ॥

Transliteration

Parvata choorna hotaa nigutee | Tey paahuni Machchindra-jatee | Bhramee astra yojuuni uparatee | Mitra bhaagee saandeetase ||

Ovee 97

तें अस्त्र होतां स्पंदनी प्रविष्ट । वाजींसह अरुण झाला भ्रमिष्ट । सांडूनि रहाणीची नित्य वाट । स्पंदन नेती भलतीकडे ॥

Transliteration

Tey astra hotaa sandanee pravishtu | Vaajeensaha Aruna jhaalaa bhramishtu | Saanduuni rahaaneechee nitya vaatu | Sandana netee bhalateekade ||

Ovee 98

तें पाहूनियां द्वादशनामी । ज्ञानशराच्या न उरल्या गुणऊर्मी ॥तेणें करुनि भ्रमें प्रकामी । नाशाप्रती पावतसे ॥

Transliteration

Tey paahuuniyaa dvaadasha-naamee | Jnyaana-sharaachyaa na uralyaa gunaoormee || Tene karuni bhrame prakaamee | Naashaa-pratee paavatase ||

Ovee 99

जैसा पेटला पावक । त्यावरी सोपविलें सकळ उदक । मग तो उरे केवीं दाहक । तेवीं अर्का झाले असे ॥

Transliteration

Jaisaa petalaa paavaku | Tyaavaree sopavile sakala udaku | Maga toh ure kevee daahaku | Tevee Arkaa jhaale ase ||

Ovee 100

कीं अज्ञानपण साधकाचें । श्रीसद्गुरु निवारीत वाचें । अंगीं भूषण ज्ञानपणाचें । बोधगुणीं गोवीतसे ॥

Transliteration

Kee ajnyaana-pana saadhakaache | Shree-Sad-guru nivaareeta vaache | Angee bhooshana jnyaana-panaache | Bodha-gunee goveetase ||

Ovee 101

कीं सदनांत दाटला अंधार अपार । तो दीप उजळितां होतो दूर । तन्न्यायें श्रीभास्कर । ज्ञानेश्वरा प्रेरितसे ॥

Transliteration

Kee sadanaanta daatalaa andhaara apaaru | Toh deepa ujalitaa hoto dooru | Tannyaaye Shree-Bhaaskaru | Jnyaaneshvaraa preritase ||

Ovee 102

तेणें उडवूनि भ्रमिष्टपण । सुपंथसुपंथा करी गमन । तें मच्छिंद्रनाथें दृष्टीं पाहोन । वाताकर्षण जल्पत ॥

Transliteration

Tene udavuuni bhramishta-panu | Supantha-supanthaa karee gamanu | Tey Machchindra-Naathe drishtee paahonu | Vaataakarshana jalpatu ||

Ovee 103

वातास्त्र आकर्षण सबळ । वायुवक्रीं भेदिलें तुंबळ । मग वाजींचे आणि सारथ्याचे तये वेळ । श्वासोच्छवास राहिले ॥

Transliteration

Vaata-astra aakarshana sabalu | Vaayu-chakree bhedile tumbalu | Maga vaajeenche aani saarathyaache taye velu | Shvaasochcha-vaasa raahile ||

Ovee 104

आणि जो प्रत्यक्ष चंडीकरण । तोही दाटला श्वासेंकरुन । वायुचक्री गेले आटून । रथ उलथोनि पडियेला ॥

Transliteration

Aani jo pratyaksha chandee--karanu | Tohee daatalaa shvaasen-karunu | Vaayu-chakree gele aatuunu | Ratha ulathoni padiyelaa ||

Ovee 105

वायुचक्राचा ज्यासी आधार । तों आधार तुटतांचि सत्वर । स्वर्गाहूनि उर्वीवर । आदळला स्यंदन तो ॥

Transliteration

Vaayu-chakra-achaa jyaasee aadhaaru | Toh aadhaara tutataanchi satvaru | Svargaahuuni urveevaru | Aadalalaa sandana toh ||

Ovee 106

महीं आदळतां दिव्य रथ । खालीं पडला श्रीआदित्य । स्यंदनीं वाजी अति होत । कासाविस श्वासानें ॥

Transliteration

Mahee aadalataa divya rathu | Khaalee padalaa Shree-Aadityu | Sandanee vaajee ati hotu | Kaasaavisa shvaasaane ||

Ovee 107

परी महीं पडतां तेजोराशिपाळ । महीं मातला अति अनळ । तेणें दाहूं पाहे सकळ । महीवरले उद्भिज्ज ॥

Transliteration

Paree mahee padataa tejo-raashi-paalu | Mahee maatalaa ati analu | Tene daahoo paahe sakalu | Mahee-varale udbhijja ||

Ovee 108

तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । जलदास्त्र स्मरे त्वरित । तेणेंकरुनि अपरमित । जलवृष्टी होतसे ॥

Transliteration

Tey paahuuni Machchindra-Naathu | Jalada-astra smare tvaritu | Tenenkaruni aparamitu | Jala-vrishtee hotase ||

Ovee 109

परी आदित्य पडतां निचेष्टित । परम घाबरले स्वर्गदैवत । मग विमानयानीं होऊनि त्वरित । मच्छिंद्रापाशीं पातले ॥

Transliteration

Paree Aaditya padataa nicheshtitu | Parama ghaabarale Svarga-daivatu | Maga vimaana-yaanee houuni tvaritu | Machchindraa-paashee paatale ||

Ovee 110

ब्रह्मा विष्णु आणि शिव । वरुण अश्विनी कुबेर देव । सुरवर अनादि सकळ गंधर्व । महीलागीं पातले ॥

Transliteration

Brahmaa Vishnu aani Shivu | Varuna Ashvinee Kubera daivu | Suravara anaadi sakala gandharvu | Mahee-laagee paatale ||

Ovee 111

सत्यलोक तपोलोक । अतळ वितळ सुतळादिक । संकटीं पडला एक अर्क । लागवेगीं धांविन्नले ॥

Transliteration

Satyaloka Tapoloku | Atala Vitala Sutalaadiku | Sankatee padalaa eka Arku | Laaga-vegee dhaavinnale ||

Ovee 112

जैसे सकळ तरुवरतीं । चहूंकडूनि पक्षी येती । तन्न्यायें महीवरती । सकळ देव उतरले ॥

Transliteration

Jaise sakala taru-varatee | Chahoon-kaduuni pakshee yetee | Tannyaaye mahee-varatee | Sakala deva utarale ||

Ovee 113

मग महाराजा क्षीराब्धिजांवई । धांवूनि मच्छिंद्र धरिला हृदयीं । म्हणे हा आदित्य कोण न्यायी । संकटीं तुवां योजिला ॥

Transliteration

Maga Mahaaraajaa Ksheera-abdhi-jaavaee | Dhaavuuni Machchindra dharilaa hridayee | Mhane haa Aaditya kona nyaayee | Sankatee tuvaa yojilu ||

Ovee 114

याउपरी करुनि नमस्कार । विष्णुतें देत उत्तर । म्हणे महाराजा पाशुपतवीर । आदित्यकुळीं असे हा ॥

Transliteration

Yaauparee karuni namaskaaru | Vishnute deta uttaru | Mhane Mahaaraajaa Paashupata-veeru | Aaditya-kulee ase haa ||

Ovee 115

ऐसें असतां यथार्थ । वंशजासी न पाहे हा आदित्य । तस्मात् वडिलांची धर्मनीत । ऐसेपरी असावी कां ॥

Transliteration

Aise asataa yathaarthu | Vamsha-jaasee na paahe haa Aadityu | Tasmaatu vadilaanchee dharma-neetu | Aise-paree asaavee kaa ||

Ovee 116

जिया मातेने बालकांचे संगोपन । तिया रोषाची केली पाखरण । मग ती माता काय म्हणून । लावेपरी मिरवावी ॥

Transliteration

Jiyaa maatene baalakaanche sangopanu | Tiyaa roshaachee kelee paakharanu | Maga tee maataa kaaya mhanuunu | Laave-paree miravaavee ||

Ovee 117

स्वामी सेवकां अमित्र मानी । मग कार्य कैचें येत घडोनि । सदा संशयाची गवसणी । उभयचित्तीं मिरवतसे ॥

Transliteration

Svaamee sevakaa amitra maanee | Maga kaarya kaiche yeta ghadoni | Sadaa sanshayaachee gavasanee | Ubhaya-chittee miravatase ||

Ovee 118

तस्मात् राय पाशुपती । नावडे या आदित्याप्रती । म्हणूनि ऐसा वैकुंठपती । चर्याभाग रचियेला ॥

Transliteration

Tasmaatu raaya Paashupatee | Naavade yaa Aaditya-pratee | Mhanuuni aisaa Vaikuntha-patee | Charyaa-bhaaga rachiyelaa ||

Ovee 119

आणिक एक मम वागुत्तरासी । साबरीविद्या कवित्वराशी । सूर्यनामें मंत्र उपदेशी । प्रसन्न असावें अर्काने ॥

Transliteration

Aanika eka mama vaagu-uttaraasee | Saabaree Vidyaa kavitva-raashee | Soorya-naame mantra upadeshee | Prasanna asaave Arkaane ||

Ovee 120

याउपरी आणिक आहे चोज । सूर्यवंशीं विजयध्वज । तो पाशुपतातें श्रीराम आज । भेटवावा महाराजा ॥

Transliteration

Yaauparee aanika aahe choju | Soorya Vamshee vijaya-dhvaju | Toh Paashupataate Shree-Raama aaju | Bheta-vaavaa Mahaaraajaa ||

Ovee 121

ऐसेपरी कामना मनीं । वेधली आहे चक्रपाणी । पाशुपतरायाचें प्रेमवदनीं । गुंती पावलों भक्तीनें ॥

Transliteration

Aise-paree kaamanaa manee | Vedhalee aahe Chakra Paanee | Paashupata-raayaache prema-vadanee | Guntee paavalo bhakteene ||

Ovee 122

नवराणिवासह माझा काम । पूर्णते आणा मेघश्याम । ऐसें बोलता योगद्रुम । हरी उत्तरा स्वीकारी ॥

Transliteration

Nava-raani-vaasaha maajhaa kaamu | Poornate aanaa Megha-hyaamu | Aise bolataa yoga-drumu | Haree uttaraa sveekaaree ||

Ovee 123

म्हणे बा रे योगद्रुमा । जो जो काय वेधला काम । तो तूं पावशील कल्पद्रुमा । परी सावध करी अर्कातें ॥

Transliteration

Mhane baa re yoga-drumaa | Jo jo kaaya vedhalaa kaamu | Toh too paavasheela kalpa-drumaa | Paree saavadha karee Arkaate ||

Ovee 124

बा रे सूर्यनामीं मंत्र । जगीं होतील प्रविष्ट पवित्र । तै स्वकष्टानें येऊनि मित्र । कार्य करील लोकांचे ॥

Transliteration

Baa re Soorya-naamee mantru | Jagee hoteela pravishta pavitru | Tai e ava-kashtaane yeuuni mitru | Kaarya kareela lokaanche ||

Ovee 125

ऐसें बोलूनि चक्रपाणी । करतळा कर देत वचनीं । म्हणे बा रे भास्कर मंत्रालागुनी । वरदाता झालासे ॥

Transliteration

Aise boluuni Chakra Paanee | Karatalaa kara deta vachanee | Mhane baa re Bhaaskara mantraa-laagunee | Varadaataa jhaalaase ||

Ovee 126

बा रे तव मंत्र लोकोपकार । नामस्मरणीं होता नर । तेणेंचि पातक योग भद्र । सकळ जनांचे मिटतील ॥

Transliteration

Baa re tava mantra lokopakaaru | Naama-smaranee hotaa naru | Tenenchi paataka yoga bhadru | Sakala janaanche mitateelu ||

Ovee 127

सहज सूर्याचें वदतां नाम । सकळ पातकें होतील भस्म । तैशांत मंत्रप्रयोग उत्तम । कार्यालागीं दुणावेल ॥

Transliteration

Sahaja Sooryaache vadataa naamu | Sakala paatake hoteela bhasmu | Taishaanta mantra-prayoga uttamu | Kaaryaa-laagee dunaavelu ||

Ovee 128

नाममंत्रयुक्त प्रयोग । त्यावरी तव वाणी पवित्र अभंग । त्याहीवरती वरद चांग । प्रत्यक्ष दैवतें मिरवतील ॥

Transliteration

Naama-mantra-yukta prayogu | Tyaa-varee tava vaanee pavitra abhangu | Tyaa-hee-varatee varada chaangu | Pratyaksha daivate miravateelu ||

Ovee 129

तरी बा सोळा राशी पावलें । सुवर्ण जडावासी गमले । तें भूषण मोला चढलें । मान्य केवीं होईना ॥

Transliteration

Taree baa solaa raashee paavale | Suvarna jadaa-vaasee gamale | Tey bhooshana molaa chadhale | Maanya kevee hoeenaa ||

Ovee 130

तरी या कामा कदा आळस । होणार नाहीं महापुरुष । आम्ही सर्व देत तव वचनास । उतरलों आहों महाराजा ॥

Transliteration

Taree yaa kaamaa kadaa aalasu | Honaara naahee mahaa-purushu | Aamhee sarva deta tava vachanaasu | Utaralo aaho Mahaaraajaa ||

Ovee 131

वीरभद्राचे समरंगणीं । आणी नागपत्रअश्वत्थस्थानीं । तूतें ओपूनि वरदवाणी । तुष्ट केलें आधींच ॥

Transliteration

Veera Bhadraache sama-ranganee | Aanee Naaga-patra-Ashvattha-sthaanee | Toote opuuni varada-vaanee | Tushta kele aadheenchu ||

Ovee 132

तरी आतां संशय । सांडूनि अर्का जीववावें । याचि रीतीं देव अवघे । गौरविती मच्छिंद्रा ॥

Transliteration

Taree aataa sanshayu | Saanduuni Arkaa jeevavaave | Yaachi reetee deva avaghe | Gauravitee Machchindraa ||

Ovee 133

जैसे एका चंद्राबुसाठी । न्याहाळिती चकोर पाठी । तेवीं जगलोचना दिठीं । सकळ देव गौरविती ॥

Transliteration

Jaise ekaa Chandraa-busaathee | Nyaahaalitee chakora paathee | Tevee jaga-lochanaa dithee | Sakala deva gauravitee ||

Ovee 134

मच्छिंद्र म्हणे पाशुपतराया । आधी दावीन राम काया । तेव्हांचि समाधान तरी राया । मम चित्तांत ओसंगी ॥

Transliteration

Machchindra mhane Paashupata-raayaa | Aadhee daaveena Raama kaayaa | Tevhaanchi samaadhaana taree raayaa | Mama chittaanta osangee ||

Ovee 135

ऐसी ऐकतां मच्छिंद्रवाणी । सौमित्रासह सगुणी । प्रगट झाला कोदंडपाणी । दशरथतनय महाराज ॥

Transliteration

Aisee aikataa Machchindra-vaanee | Saumitraa-saha sagunee | Pragata jhaalaa Kodanda Paanee | Daśarathatanaya Mahaaraaja ||

Ovee 136

मग राममूर्ती प्रगट होतां । शिवासी आनंद वाटला चित्ता । जयानें राया पाशुपता । आनंदसरिता उचंबळली ॥

Transliteration

Maga Raama-moortee pragata hotaa | Shivaasee aananda vaatalaa chittaa | Jayaane raayaa Paashupataa | Aananda-saritaa uchambalalee ||

Ovee 137

मच्छिंद्रें देखता कोदंडपाणी । भावे मस्तक ओपिलें चरणीं । रामें प्रेमें धरुनि वक्षःस्थानीं । मच्छिंद्रनाथ कवळिला ॥

Transliteration

Machchindre dekhataa Kodanda Paanee | Bhaave mastaka opile charanee | Raame preme dharuni vaksha-sthaanee | Machchindra-Naatha kavalilaa ||

Ovee 138

पाशुपतराव भाविक पूर्ण । तोही वंदी श्रीरामचरण । राम त्यातें हृदयीं धरुन । धन्य वंश म्हणतसें ॥

Transliteration

Paashupata-raava bhaavika poornu | Tohee vandee Shree-Raama-charanu | Raama tyaate hridayee dharunu | Dhanya vamsha mhanatase ||

Ovee 139

यावरी मच्छिंद्र जोडोनि दोन्ही हस्त । नम्रोत्तरीं स्तवूनि रघुनाथ । गौरवोनि रामा बोधत । हे रघुत्तमा महाराजा ॥

Transliteration

Yaavaree Machchindra jodoni donhee hastu | Namrottaree stavuuni Raghu-Naathu | Gauravoni Raamaa bodhatu | Hey Raghu-uttamaa Mahaaraajaa ||

Ovee 140

तव नामें अनंत असती । तेवीं त्यांत रामनाम गंगा वसती । सर्वांत श्रेष्ठ सीतापती । ग्रंथामाजी निवेदिलें ॥

Transliteration

Tava naame ananta asatee | Tevee tyaanta Raama-naama Gangaa vasatee | Sarvaanta shreshtha Seetaa-patee | Granthaa-maajee nivedile ||

Ovee 141

त्याही ग्रंथां नाहीं मिती । परी तव नामें शुभ ते असती । तेवी माझ्या कवित्वाप्रती । वदनपात्रीं विराजिजे ॥

Transliteration

Tyaahee granthaa naahee mitee | Paree tava naame shubha tey asatee | Tevee maajhyaa kavitvaa-pratee | Vadana-paatree viraajije ||

Ovee 142

साबरीविद्येचें अपार वचन । मंत्रप्रयोगीं कवित्व पूर्ण । जेथें येईल तुझें नाम । तेथें कार्य करावें समग्र त्वां ॥

Transliteration

Saabaree-vidyeche apaara vachanu | Mantra-prayogee kavitva poornu | Jethe yeeela tujhe naamu | Tethe kaarya karaave samagra tvaa ||

Ovee 143

तव नामीं होतां मंत्रोच्चार । तें त्वां कार्य करावें समग्र लवकर । तरी प्रांजळ चित्ती देवीं कर । मम करीं ओपावा ॥

Transliteration

Tava naamee hotaa mantra-ucchaaru | Tey tvaa kaarya karaave samagra lavakaru | Taree praanjala chittee devee karu | Mama karee opaavaa ||

Ovee 144

चित्तीं असेल जरी अवमान । तरी सज्ज करीं कां कोदंडबाण । माजवोनि आतां समरंगण । नृत्य करु रणांगणीं ॥

Transliteration

Chittee asela jaree avamaanu | Taree sajja karee kaa Kodanda-baanu | Maajavoni aataa sama-ranganu | Nritya karu ranaanganee ||

Ovee 145

श्रीराम म्हणे मच्छिंद्रा ऐक । तूं तिहीं देवांचा वरदायक । श्रीदत्तात्रेय प्रतापार्क । अवतार तिघा देवांचा ॥

Transliteration

Shree-Raama mhane Machchindraa aiku | Too tihee devaanchaa varadaayaku | Shree-Dattaatreya prataapa-Arku | Avataara tighaa devaanchaa ||

Ovee 146

आणि नरसिंह अवतार पूर्णब्रह्म । ते तुज वश्य आहेत योगद्रुमा । तेथें मी कां नसावें साह्यार्थकामा । साह्य असो तुज आतां ॥

Transliteration

Aani Narasimha avataara poorna-Brahmu | Tey tuja vashya aaheta yogadrumu | Tethe mee kaa nasaave saahya-artha-kaamaa | Saahya aso tuja aataa ||

Ovee 147

तुझ्या मंत्रीं माझे स्मरण । होतांचि कार्य करीन । बावनवीरांत सबळ आचरण । मंत्रप्रयोगीं दावीन मी ॥

Transliteration

Tujhyaa mantree maajhe smaranu | Hotaanchi kaarya kareenu | Baavana-veeraanta sabala aacharanu | Mantra-prayogee daaveena mee ||

Ovee 148

ऐसी वदूनि वरदवाणी । भाष देत मच्छिंद्रपाणी । मग म्हणे हे योगधामी । मज तुज ऐक्य असे कीं ॥

Transliteration

Aisee vaduuni varada-vaanee | Bhaasha deta Machchindra-paanee | Maga mhane hey yoga-dhaamee | Maja tuja aikya ase kee ||

Ovee 149

तूं विष्णूचा अवतार । जो कविनारायण महाथोर । तस्मात् तुझें शरीर । ऐक्यत्व असें या लोकीं ॥

Transliteration

Too Vishnoochaa avataaru | Jo Kavi Naaraayana mahaa-thoru | Tasmaatu tujhe shareeru | Aikyatva ase yaa lokee ||

Ovee 150

ऐसें बोलोनि कौसल्यासुत । धन्य म्हणवूनि ग्रीवा तुकावीत । यावरी बोले सावध आदित्य । वेगें करीं तपोराया ॥

Transliteration

Aise boloni Kausalyaa-sutu | Dhanya mhanavuuni greevaa tukaaveetu | Yaavaree bole saavadha Aadityu | Vege karee tapo-raayaa ||

Ovee 151

एक मित्रावांचूनि धरणी । झाली असे दिनवाणी । तरी योगींद्रा सुखधामीं । मम पूर्वजां मिरवीं कां ॥

Transliteration

Eka Mitraa-vaanchuuni dharanee | Jhaalee ase dina-vaanee | Taree yogeendraa sukha-dhaamee | Mama poorvajaa miravee kaa ||

Ovee 152

महीं पडला अंधकार । देव त्रास पावले समग्र । सकळ जगाचा व्यवहार । खोळंबला तपोराया ॥

Transliteration

Mahee padalaa andha-kaaru | Deva traasale paavale samagru | Sakala jagaachaa vyavahaaru | Kholambalaa taporaayaa ||

Ovee 153

ऐसे ग्लानीं सुढाळ वचन । श्रीराममुखीं ऐकोन । तें मच्छिंद्रहृदयीं अपार भूषण । चित्तशक्तीतें मिरविले ॥

Transliteration

Aise glaanee sudhaala vachanu | Shree-Raama-mukhee aikonu | Tey Machchindra-hridayee apaara bhooshanu | Chitta-shakteete miravile ||

Ovee 154

तेणें परम आनंदवृत्ती । प्रसन्न झाली चित्तभगवती । मग वातास्त्रमंत्र देहस्थव्यक्ती । प्रसादातें ओपीतसे ॥

Transliteration

Tene parama aananda-vrittee | Prasanna jhaalee chitta-bhagavatee | Maga Vaata-astra-mantra dehastha-vyaktee | Prasaadaate opeetase ||

Ovee 155

वातयुक्त अस्त्र पूर्ण । मुखीं जल्पतां मच्छिंद्रयोगिजन । मग सुटी पावोनि वातकर्षण । सुखी केला आदित्य तो ॥

Transliteration

Vaata-yukta astra poornu | Mukhee jalpataa Machchindra-yogi-janu | Maga sutee paavoni Vaatakarshanu | Sukhee kelaa Aaditya toh ||

Ovee 156

मग सावध होऊनि महीं बैसत । दाही दिशा न्याहाळीत । तों अपार दृष्टी देखूनि दैवतें । सकळांलागी पाचारी ॥

Transliteration

Maga saavadha houuni mahee baisatu | Daahee dishaa nyaahaaleetu | Toh apaara drishtee dekhuuni daivate | Sakalaa-laagee paachaaree ||

Ovee 157

सकळ दैवतें जाऊनि तेथ । नमिला महाराज प्रताप आदित्य । यावरी विष्णूलागीं पुसत । क्षत्रिय कोण ऐसा आहे ॥

Transliteration

Sakala daivate jaauuni tethu | Namilaa Mahaaraaja prataapa Aadityu | Yaavaree Vishnoo-laagee pusatu | Kshatriya kona aisaa aahe ||

Ovee 158

कीं वासना पुन्हां परतून । हरुं पाहत श्यामकर्ण । धन्य प्रतापी प्रतापगहन । आजि दावीं कां मजकारणें ॥

Transliteration

Kee vaasanaa punhaa paratuunu | Haru paahata shyaama-karnu | Dhanya prataapee prataapa-gahanu | Aaji daavee kaa maja-kaarane ||

Ovee 159

तरी ऐसें प्रतिज्ञे लागून । कीं युगानुयुगीं असें प्रसन्न । तरी तयाचें मुखमंडन । मज भेटीतें आणावें ॥

Transliteration

Taree aise pratijnye laaguunu | Kee yuga-anuyugee ase prasannu | Taree tayaache mukha-mandanu | Maja bheteete aanaave ||

Ovee 160

मग मच्छिंद्रातें देव पाचारिती । कीं तुज बोलावीतसे गभस्ती । मग चंद्रास्त्र जल्पूनि उक्ती । दर्शना जात मच्छिंद्र ॥

Transliteration

Maga Machchindraate deva paachaaritee | Kee tuja bolaaveetase gabhastee | Maga Chandra-astra jalpuuni uktee | Darshanaa jaata Machchindru ||

Ovee 161

मित्र दाहक तो अति सबळ । म्हणूनि चंद्रास्त जपला मच्छिंद्रबाळ । तें मागें पुढें परम शीतळ । चंद्रास्त्री मिरवीतसे ॥

Transliteration

Mitra daahaka toh ati sabalu | Mhanuuni Chandraasta japalaa Machchindra-baalu | Tey maage pudhe parama sheetalu | Chandra-astree miraveetase ||

Ovee 162

त्यांत जलदास्त्राचा वर्षाव । होवोनि होत शीतल ठाव । ऐसें योजूनि सविताराव । जाऊनिया नमियेला ॥

Transliteration

Tyaanta Jalada-astraachaa varshaavu | Hovoni hota sheetala thaavu | Aise yojuuni Savitaa-raavu | Jaauuniyaa namiyelaa ||

Ovee 163

सर्वांतें देखूनि मच्छिंद्रनाथ । धन्य धन्य ऐसें म्हणत । कवण नामीं असे पुसत । ग्राम धाम जन्मादि ॥

Transliteration

Sarvaante dekhuuni Machchindra-Naathu | Dhanya dhanya aise mhanatu | Kavana naamee ase pusatu | Graama dhaama janmaadi ||

Ovee 164

मग विष्णुवनें मुळापासूनि कथा । नामधामादि सांगितली वार्ता । कविनारायण महीवरता । मच्छिंद्रनाथ मिरवतसे ॥

Transliteration

Maga Vishnuvane mulaa-paasuuni kathaa | Naama-dhaamaadi saangitalee vaartaa | Kavi Naaraayana mahee-varataa | Machchindra-Naatha miravatase ||

Ovee 165

येरी म्हणे माझा अंश । नवनारायण असती महीस । तयांचा अवतार शुभ आम्हांस । चांगुलपणीं वाटला हा ॥

Transliteration

Yeree mhane maajhaa amshu | Nava Naaraayana asatee maheesu | Tayaanchaa avataarau shubha aamhaansa| Chaangula-panee vaatalaa haa ||

Ovee 166

तरी बा रे मच्छिंद्रनाथा । कवण कामनीं वेधली व्यथा । तें मज वदूनि वरदामृता । प्राशन करीं महाराजा ॥

Transliteration

Taree baa re Machchindra-Naathaa | Kavana kaamanee vedhalee vyathaa | Tey maja vaduuni varada-amritaa | Praashana karee Mahaaraajaa ||

Ovee 167

कृत त्रेता द्वापारयुग गेलें । परी ऐसें नाहीं केले । धन्य तुझा प्रताप असे विपुल । धन्य गुरु तुझा तो ॥

Transliteration

Krita Tretaa Dvaapaara-yuga gele | Paree aise naahee kele | Dhanya tujhaa prataapa ase vipulu | Dhanya guru tujhaa toh ||

Ovee 168

येरु म्हणे कर जोडोनी । मम वेधली कामना मनीं । साबरीविद्या कवित्वकरणी । कृपा करुनि दाविली ॥

Transliteration

Yeru mhane kara jodonee | Mama vedhalee kaamanaa manee | Saabaree Vidyaa kavitva-karanee | Kripaa karuni daavilee ||

Ovee 169

परी त्यातें वरद आपुला । असावा ऐसें वाटतें मनाला । तरी कृपा करुनि वर त्याला । दिधला पाहिजे महाराजा ॥

Transliteration

Paree tyaate varada aapulaa | Asaavaa aise vaatate manaalaa | Taree kripaa karuni vara tyaalaa |Didhalaa paahije Mahaaraajaa ||

Ovee 170

मंत्रप्रयोगी तुझें स्मरण । होता व्हावें दृश्यमान । जगाचे कार्य मंत्रसाधन । स्वकष्टानें मिरवावें ॥

Transliteration

Mantra-prayogee tujhe smaranu | Hotaa vhaave drishya-maanu | Jagaache kaarya mantra-saadhanu | Sva-kashtaane miravaave ||

Ovee 171

ऐसी ऐकतां मच्छिंद्रवाणी । अवश्य म्हणे वासरमणी । मंत्रप्रयोग स्वयें घेऊनि । कार्य करीन जगाचें ॥

Transliteration

Aisee aikataa Machchindra-vaanee | Avashya mhane vaasara-manee | Mantra-prayoga svaye gheuuni | Kaarya kareena jagaache ||

Ovee 172

ऐसें वदोनि जगलोचनी । भाष देत करतळींवचनीं । यावरी पाशुपतराया बोलावुनी । चरणावरी घातला ॥

Transliteration

Aise vadoni jaga-lochanee | Bhaasha deta karatalee-vachanee | Yaavaree Paashupata-raayaa bolaavunee | Charanaa-varee ghaatalaa ||

Ovee 173

सूर्यवंशीं वीर्यप्रवाह । वंशमालिका सगुण सर्व । तुष्ट केला सविताराव । मच्छिंद्रानें ते समयीं ॥

Transliteration

Soorya Vamshee veerya-pravaahu | Vamsha-maalikaa saguna sarvu | Tushta kelaa Savitaa-raavu | Machchindraane tey samayee ||

Ovee 174

वंशमालिका ऐसी ऐकून । संतुष्ट झाला सवितानारायण । मग आपुला सिद्ध करुनि स्पंदन । वातचक्रा आव्हानी ॥

Transliteration

Vamsha-maalikaa aisee aikuunu | Santushta jhaalaa Savitaa-Naaraayanu | Maga aapulaa siddha karuni spandanu | Vaata-chakraa aavhaanee ||

Ovee 175

येरीकडे सकळ देव । विमानयानीं गेले सर्व । आपुलालें स्थान अपूर्व । पाहते झाले ते वेळां ॥

Transliteration

Yereekade sakala devu | Vimaana-yaanee gele sarvu | Aapulaale sthaana apoorvu | Paahate jhaale tey velaa ||

Ovee 176

येरीकडे मच्छिंद्रनाथ कृपें आव्हानूनि पाशुपत । निघता झाला करुनि तीर्थ । राममूर्ती वंदूनिया ॥

Transliteration

Yereekade Machchindra-Naathu|Kripe aavhaanuuni Paashupatu | Nighataa jhaalaa karuni teerthu | Raama-moortee vanduuniyaa ||

Ovee 177

आतां पुढील अध्यायीं कथन । चंद्रागिरि पाहिला ग्राम । तेथें गवरांतूनि गोरक्ष काढून । पुन्हा तीर्थे करील कीं ॥

Transliteration

Aataa pudheela adhyaayee kathanu | Chandraa Giri paahilaa graamu | Tethe gavaraantuuni Goraksha kaadhuunu | Punhaa teerthe kareela kee ||

Ovee 178

नरहरिवंशीं धुंडीसुत । मालू हरीचा शरणागत । पुढिले अध्यायीं उत्तम कथेंत । निवेदील श्रोतियांसी ॥

Transliteration

Narahari-vamshee Dhundee Sutu | Maaloo hareechaa sharanaagatu | Pudhile adhyaayee uttama kathetu | Nivedeela shrotiyaansee ||

Ovee 179

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । अष्टमाध्याय गोड हा ॥

Transliteration

Svasti Shree-Bhakti-Kathaa-Saaru | Sammata Goraksha-Kaavya Kimayaa-gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Ashtama-Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

Shri Krishnarpanamastu

Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार अष्टमाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Ashtama Adhyaya Samapth